जा. क्र. ना. बँका/डी-४/कलम ८३-८८/अहवाल/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक ऑक्टोबर २००८ ते ३ नोव्हेंबर २००८

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व)

**विषय : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये सुरू असलेल्या चौकशा तात्काळ पूर्ण करणेचे अनुषंगाने नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून त्यानुषंगाने लाक्षांकाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत....**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. प्रधान सचिव (सहकार) यांनी दि. १८-१०-२००८ रोजी पुणे येथे विभागीय सहनिबंधक यांची आढावा सभा घेताना, राज्यात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व ८८ अन्वये सुरू असलेल्या चौकशा या वेळेत पूर्ण करण्याबाबत निर्देश देऊन त्यानुषंगाने मार्च २००९ पर्यंत प्रत्येक विभागीय सहनिबंधक यांना त्यांचे विभागातील सुरु असलेल्या चौकशा पूर्ण करणेचे अनुषंगाने त्यांचेकडून लाक्षांक घेऊन त्याप्रमाणे कार्यवाहीचे निर्देश दिलेले आहेत.

सबब आपणास कळविण्यात येते की, पतसंस्था बाबतचे माहितीचे अनुषंगाने आपले विभागात सद्यस्थितीत किती पतसंस्थांची कलम ८३ व कलम ८८ अन्वये चौकशी सुरु असून, मार्च २००९ पर्यंत किती पतसंस्थांची सदरची चौकशी पूर्ण करण्यात येणार आहे व त्यानुषंगाने संबंधित जबाबदार अपचारी यांचेकडून मार्च २००९ पर्यंत किती रकमेची वसुली करण्यात येणार आहे या बाबतचा नियोजनबद्ध कृती कार्यक्रम सोबत जोडलेल्या नमुन्यातील माहितीचा आधार घेऊन तयार करून आपले विभागातील पतसंस्था बाबतची माहिती पतसंस्थांच्या यादीसह तसेच आपल्या कृती आराखड्याचे अनुषंगाने करावयाच्या सविस्तर कार्यवाही बाबतचा संपूर्ण आराखडा दोन दिवसात या कार्यालयातील पतसंस्था विभागाकडे सादर करावी व लाक्षांकाचे अनुषंगाने कार्यवाही होईल याप्रमाणे नियोजन करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश आपले विभागातील सर्व संबंधित निबंधकांना देण्यात यावेत व त्याप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे.

मा. प्रधान सचिव हे या बाबतचा आढावा स्वत: घेणार असल्यामुळे आपण सदर प्रकरणी आवश्यक ती कारवाई करून लाक्षांकाप्रमाणे कार्यवाही होईल याबाबतची दक्षता घ्यावी. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील या बाबतची नोंद घेण्यात यावी.

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी रवाना
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

विभागातील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती व मार्च २००९ अखेर अशा कारवाया पूर्ण करण्याचे अनुषंगाने तसेच कलम ८८ अन्वये चौकशीनंतर वसूल करावयाच्या रकमेच्या अनुषंगाने आराखडाकामी विचारात घ्यावयाच्या बाबी –

| तक्ता क्र. १ – कलम ८३ अन्वये सुरू असलेल्या चौकशींची माहिती : | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विभागाचे नाव | जिल्ह्याचे नाव | सद्यस्थितीत कलम ८३ अन्वये चौकशी सुरु असलेल्या संस्था संख्या | पैकी मार्च २००९ अखेर कलम ८३ अन्वये चौकशी पूर्ण होणाऱ्या संस्था संख्या | शेरा |
| | | | | | |

- कलम ८३ अन्वये चौकशी सुरु असलेल्या संस्थांची यादी–संस्थेचे नाव, चौकशी अधिकारी यांचे नाव व आदेशाचा दिनांक यासह माहिती द्यावी.
- कलम ८३ अन्वये चौकशी सुरु असलेल्या ज्या पतसंस्थांची चौकशी मार्च २००९ पर्यंत पूर्ण होणार आहे त्या पतसंस्थांची यादी द्यावी.
- मार्च २००९ अखेर चौकशी पूर्ण होणाऱ्या संस्थांमध्ये ज्या संस्थांची चौकशी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहे त्यांचा समावेश करुन अशा चौकशा मार्च २००९ अखेर पूर्ण करण्यात येण्याचे अनुषंगाने त्याबाबत सविस्तर विवेचन करावे.

| तक्ता क्र. २ – कलम ८८ अन्वये सुरू असलेल्या चौकशींची माहिती : | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विभागाचे नाव | जिल्ह्याचे नाव | सद्यस्थितीत कलम ८८ अन्वये चौकशी सुरु असलेल्या संस्था संख्या | पैकी मार्च २००९ अखेर कलम ८८ अन्वये चौकशी पूर्ण होणाऱ्या संस्था संख्या | शेरा |
| | | | | | |

- कलम ८८ अन्वये चौकशी सुरु असलेल्या संस्थांची यादी–संस्थेचे नाव, चौकशी अधिकारी यांचे नाव व आदेशाचा दिनांक यासह माहिती द्यावी.
- कलम ८८ अन्वये चौकशी सुरु असलेल्या ज्या पतसंस्थांची चौकशी मार्च २००९ पर्यंत पूर्ण होणार आहे त्या पतसंस्थांची यादी द्यावी. तसेच सदर चौकशी मार्च २००९ पर्यंत पूर्ण करण्याचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत सविस्तर विवेचन करावे.
- मार्च २००९ अखेर चौकशी पूर्ण होणाऱ्या संस्थांमध्ये ज्या संस्थांची चौकशी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहे त्यांचा समावेश करुन अशा चौकशी मार्च २००९ अखेर पूर्ण करण्यात याव्यात.

| तक्ता क्र. ३ – कलम ८८ अन्वये सुरू असलेल्या चौकशींची माहिती : | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विभागाचे नाव | जिल्ह्याचे नाव | सद्यस्थितीत कलम ८८ अन्वये चौकशी पुर्ण संस्था संख्या | निश्चित करण्यात आलेली जबाब–दारीची रक्कम | रक्कम वसुलीचे अनुषंगाने कलम ९८ अन्वये वसुली प्रमाणपत्रे दिलेली रक्कम | आज अखेर जबाबदारी निश्चित केल्याप्रमाणे वसुल करण्यात आलेली रक्कम | मार्च २००९ अखेर जबाबदारी निश्चित केल्याप्रमाणे वसुल करण्यात येणारी रक्कम | शेरा |
| | | | | | | | | |

- सदर माहिती सादर करताना सद्यस्थितीत कलम ८८ अन्वये चौकशी पूर्ण असलेल्या व मार्च २००९ पर्यंत पूर्ण होणाऱ्या संस्था विचारात घ्याव्यात.
- निश्चित करण्यात आलेल्या जबाबदारीची रक्कम वसुलीचे अनुषंगाने मार्च २००९ पर्यंत पूर्ण होणाऱ्या संस्थांची संख्या व जबाबदारीची रक्कम विचारात घेऊन वसुलीचे नियोजन करावे व केलेल्या नियोजनाचे सविस्तर विवेचन द्यावे.
- जबाबदारीची रक्कम प्राधान्याने वसूल होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सविस्तर नियोजन करावे व केलेल्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था

३) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था

४) मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीज फेडरेशन लि., कोल्हापूर

५) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक क्रेडिट सोसायटीज असोसिएशन लि., मुंबई

६) निवड नस्ती

प्रत माहितीस्तव :

१) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

२) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

३) मा. प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

तारीख २८-२-२००९ पर्यंत राहील.

योजनेचे स्वरुप/तपशील शासन निर्णय दि. २७-९-२००७ प्रमाणेच राहील.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या बेवसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०८२५१७५४१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(बी. एस. यमपल्ले)

विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र शासन,

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.